**महाराष्ट्र शासन**

नगर विकास विभाग,
मंत्रालय,हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२
दिनांक : १० मे, २०१८.

महाराष्ट्र
महानगरपालिका
अधिनियम

**अधिसुचना क्रमांक पीएमआर-३३१८/प्र.क्र.२५(२)/नवि-७ :** ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पुणे महानगर क्षेत्रामध्ये, कंपनी कायदा २०१३ (सन २०१३ चा अधिनियम क्र. १८) अन्वये भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांचा संयुक्त उपक्रम म्हणून स्थापित केलेल्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमीटेड कंपनीच्या माध्यमातून, सोबतच्या परिशिष्टामध्ये उल्लेख केलेले मेट्रो रेल्वे प्रकल्प (यात यापुढे, ज्यांचा निर्देश 'उक्त प्रकल्प' असा करण्यात आला आहे) हाती घेतले आहेत,

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा महा.५९) (यात यापुढे, ज्याचा निर्देश 'उक्त अधिनियम' असा करण्यात आला आहे), याच्या कलम १४९ ख च्या प्रयोजनार्थ उक्त प्रकल्प महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प म्हणून हाती घेण्याचा इरादा घोषित करणे इष्ट ठरले,

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या मधील कलम १४९ ख च्या स्पष्टीकरणान्वये यासंदर्भात प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन, महाराष्ट्र शासन उक्त प्रकल्प उक्त अधिनियमाच्या कलम १४९ ख च्या प्रयोजनार्थ महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प म्हणून घोषित करित आहे.

**परिशिष्ट**

| पुणे मेट्रो प्रकल्प कॉरिडोर (टप्पा-१) | |
|---|---|
| कॉरिडोर-१ (पिंपरी –चिंचवड ते स्वारगेट) (लांबी-१६.५८९ कि.मी. अशंत: उन्नत व अंशत: भुयारी) | पिंपरी- चिंचवड महानगरपालिका, संत तुकाराम नगर, भोसरी (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी, बोपोडी, खडकी, रेंज हिल, शिवाजीनगर, सिव्हील कोर्ट, बुधवारपेठ, मंडई, स्वारगेट |
| डेपो | रेंज हिल डेपो (कृषी महाविद्यालय परिसर) |
| कॉरिडोर-२ (वनाझ ते रामवाडी) (लांबी १४.६६५ कि.मी. पूर्णत: उन्नत) | वनाझ, आनंदनगर, आयडियल कॉलनी, नळ स्टॉप, गरवारे कॉलेज, डेक्कन जिमखाना, छत्रपती संभाजी उद्यान, पुणे महानगरपालिका, सिव्हिल कोर्ट, मंगळवार पेठ, पुणे रेल्वे स्टेशन, रुबी हॉल क्लिनीक, बंडगार्डन, येरवडा, कल्याणी नगर, रामवाडी |
| डेपो | वनाझ डेपो (कोथरुड येथील कचरा डेपो भूमी) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( श्रीराम यादव )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

G:\NOTIFICATION MRTP&MMunicorAct of Punemetro VUTP&VIUTP.docx